# प्रकरण चौथे

## प्रकरण ४ थे

# ''मंदा कदम यांच्या काव्याचे वाङ्मयीन विशेष''

### प्रस्तावना :

प्रस्तुत प्रकरणात मंदा कदम यांच्या कातरवेळ, साजणवेळा, चंदनाचे देणे आणि ऋतुनाद या चार काव्य संग्रहातील कवितांच्या वाङ्मयीन विशेषांचा अभ्यास करावयाचा आहे. काव्य संग्रहातील कवितांचा आशय पहात असताना त्याचा आकृतीबंध लक्षात घ्यावयाचा असतो. त्यामुळे आकृतीबंधात कविता कोणत्या काव्यप्रकाराने प्रकट झाली आहे हे पाहता येते. लयबध्दता, शब्दकला, भाषाशैली, अद्‌भूत आणि अमर्याद प्रतिमासृष्टी यांचा स्वरुपविशेषांचा अभ्यास करावयाचा आहे. कारण त्यावरच कवितेचे वाङ्मयीन विशेष ठरत असते. त्याचप्रमाणेच मंदा कदम यांच्या विविधांगी कवितातून व्यक्त होणाऱ्या जाणीवांचाही विचार करावयाचा आहे. संग्रहाच्या वातावरणनिर्मितीबरोबर काव्यातून प्रकटलेली प्रेमानुभूती व निसर्गानुभव यांचा विचार करावयाचा आहे.

### प्रतिमासृष्टी :

मराठी कवितेमध्ये मंदा कदम यांची अलीकडे निर्माण झालेली कविता स्पष्टपणे वेगळी आणि लक्ष वेधून घेणारी आहे. त्यांच्या कवितेचे वेगळेपण जसे त्यांच्या भाषा सौंदर्यातून जाणवते तसेच त्यांच्या आगळ्यावेगळ्या विस्मयचकित करणाऱ्या अनंत प्रतिमासृष्टीमुळे जाणवते. त्यांच्या प्रतिमासृष्टीमध्ये विविधता आहे. मानवी भावनांच्या अभिव्यक्तीसाठी येणारी पानं, झाडं, फुलं, वारा, पशु, पक्षी या प्रतिमा कवयित्रीने निसर्गातून उचलल्या आहेत. या प्रतिमा अत्यंत समर्पक आणि सार्थ आहेत. प्रतिमांमुळे इथे आशयास समृध्दी प्राप्त झाली आहे. या प्रतिमातील सूचकतेने अर्थास आगळे सौंदर्य प्राप्त झालेले आहे. उदा- 'मेघदूत' (कातरवेळ) कवितेतून कालिदासाचे 'मेघदूत' हे अजरामर काव्य आपल्या समोर येते. यात विरही यक्षाने आपली विरह वेदना मेघदूताकरवी आपल्या प्रिय पत्नीस कळविली. इथे कवयित्री म्हणते,

किती वेळा सांगू  
फार निकट येऊ नकोस  
आणखी एक मेघदूत  
उभारायचंय का  
तूझं माझं ?

या ठिकाणी 'मेघदूत' ही प्रतिमा बोलकी आहे. तसेच अचानक आयुष्यात येणाऱ्या प्रियकरासाठी कवयित्री प्रतिमा वापरते. 'कुण्या देशीचे वादळ' अवचित येणाऱ्या वादळाने बागेची, सृष्टीची जी अवस्था होते तिच इथे या कवितेतील नायिकेची झाली आहे. पहा,

कुण्या देशीचे वादळ माझ्या अंगणात आले
झाडे झाली वेडीखुळी वेल देठातून हाले

'बोनसाय' (विरोधाभास : कातरवेळ -पृ. ३५) ही प्रतिमा कवयित्रीने वापरली आहे. 'बोनसाय' करताना झाडाची मुळं छाटून त्याला मुद्दाम खुरटं केलं जातं. इथ मुळ छाटून त्या झाडाची वाढच थांबविली जाते. कवयित्री येथे म्हणते .....

इथ तर
झाड आधीच गेलय खुरटून नी
मळं तर सतत धावताहेत
लांबवर, खोलवर
केवळ तुला शोधण्यासाठी

अबोला धरलेल्या, रुसलेल्या प्रियकरासाठी कवयित्री एक सुरेख प्रतिमा वापरते. 'सदाफुली झाड' त्याचा रुसवा काढताना ती म्हणते,

माझ्या सदाफुली झाडा
सोड सोड रे अबोला
दिवे डोळ्यांचे उजळ
रंग विड्यांचा रंगला

'वठलेले झाड' ही प्रतिमा कवयित्रीचे दीर्घ प्रतिक्षेत भावना सुकून गेलेल्या मनाचे सूचन करते जे झाड प्रियकराच्या आगमनाने मोहरुन यायचे त्याच्या येण्याने तिच्या मनाची अस्वस्थता झाली आहे म्हणून ती म्हणते की......

'मी वठलेले झाड पाखरा
कशास करिशी गळा मोकळा'

तरी ही तिला आपल्या प्रियकराच्या येण्याची ओढ आहे. प्रतिक्षा कवितेत ती म्हणते,

कधी येईल सांगावा
कधी लागेल चाहूल
आणि वटल्या झाडास
पुन्हा फुटेल अंकूर ?

एकंदर 'वटलेले झाड' या प्रतिमेचा वापर कवयित्रीने अत्यंत समर्पकपणे केला आहे. वाचकांच्या मनामध्ये एक प्रकारे दीर्घ प्रतिक्षेत बुडालेल्या नायिकेचे वारंवार स्मरण होते. एवढी उत्कटता इथे अनुभवायास मिळते हे त्यांच्या प्रतिमेचे महत्वाचे विशेष जाणवते.

अचानक येऊन आपल्या आगमनाने तृप्त करणाऱ्या प्रियकराच्या भेटीचा आनंद शब्दात व्यक्त करता येत नाही. हा अनुभव 'पल्याड शब्दांच्याही' इतका शब्दातीत असतो. तप्त तृषार्त धरणीवरती आवेगाने पाऊसधारा याव्यात तसा तो येतो. 'पाऊस' ही प्रतिमा साजणाचे रुप घेवून येते. धरणीप्रमाणे कवयित्रीने विरहाच्या ग्रीष्मवेदना भोगलेल्या असतात. त्यांचे ढग आता संत गतीने वितळतात आणि .....

पल्याड शब्दांच्याहि रहावे
अद्वैताचे सुंदर फुल

हा अनुभव शब्दात व्यक्त करता येण्यासारखा नसतो.

'साजणवेळा' काव्यसंग्रहातील बहुतांशी कवितांतून प्रीतीचा अविष्कार झाला आहे. उदा- गाणे तुझेच , प्रतीक्षा, चकवा, नकोस गाऊ, एक पौर्णिमा, आज सखेगं, शाल, केशरभेट अशा कवितांतून प्रीतीच्या उत्कट भावनांचा सहजाविष्कार अनुभवयास येतो. बोरकर, इंदिरा संत, शांता शेळके यांच्या भावकवितांशी नाते जोडणाऱ्या या कविता आहेत.

## इंद्रयसंवेद्य प्रतिमा :

एखादा संपूर्ण अनुभवच प्रतिमेद्वारे व्यक्त करण्याचे कौशल्य कवयित्री मंदा कदम यांच्या कवितेत बऱ्याचदा दिसून येते आणि मग त्यात परस्पर विरोधी भावनांच्या अनेकविद्य अर्थछटा सरमिसळून व्यक्त होताना दिसतात.

मंदा कदम यांच्या वृत्तीप्रवृत्तीला ज्या संवेदनेची ओढ भासते ती संवेदना ती अनुभूती त्यांच्या काव्यातून प्रकट होते आणि मग स्पर्श, रस, गंध, दृष्टी आणि श्रावण यांच्याशी संगती जोडलेल्या अनेक प्रतिमा साकार होताना दिसतात.

किती कोवळा पाऊस
हलकासा शिडकावा
त्याचा मखमली स्पर्श
कुण्या सखीचा सांगावा

(ऋतुनाद - पृ. २७)

इथे पावसाचा होणारा मखमली स्पर्श, स्पर्शसंवेदना मूर्त करणारा आहे. प्रियकराचा हा मखमली, शितल स्पर्श एवढा प्रभावी आहे की, कुण्या सखीचा सांगावा आल्याची स्पर्शजाणिव व्हावी. 'मखमली स्पर्श' ही मंदा कदम यांच्या मनातील प्रतिमा भावोन्मेष मूर्त करणारी ठरते पुढे ती म्हणते-

आला शहारला वारा
आल्या गंधगारा धारा
चिंब धरतीची कूस
सवे साजणाचा श्वास
धुंद वृक्षवेली पर्णे
नदी नाले गाते गाणे

(ऋतुनाद - पृ. १९)

इथे श्रुतिसंवेदनांचा पूरच दिसून येतो. त्यामुळे ही संपूर्ण कविताच एक प्रतिमा म्हणून मानावीशी वाटते. पावसाच्या धारा, चिंब झालेली धरती, नदीचा आवाज, धुंद झालेली झाडाची पाने इत्यादी इथले सर्व अनुभव श्रुतिसंवेदनेतून मूर्त होत आहेत.

## पौराणिक प्रतिमा :

कवयित्री मंदा कदम यांच्या कवितेत पौराणिक प्रतिमा येताना दिसतात. विशेषतः कृष्णभक्तीपर असलेल्या त्यांच्या कविता पाहताना या प्रतिमांचा वापर मोठ्या प्रमाणात झालेला दिसून येतो. कवयित्रीच्या श्रध्दाशील मनाला अध्यात्मिकतेची आवड विशेष प्रमाणात दिसते.

कृष्णाच्या अस्तित्वाच्या भासाने भारावलेल्या कवयित्रीच्या मनाचे स्पंदन या कवितेतून दिसून येते त्यामुळे त्यांच्या कवितांना पौराणिक रंग प्रतिमांचा वापर दिसून येतो.

बघ पाणावले डोळे
निळे डोळ्यातच घन
झाली निळीचीच बाधा
आणि जडावले मन

इथे कवयित्रीचे डोळे कृष्णसख्याच्या विरहाने पाणवले आहेत. त्याच्या अस्तित्वाशी तीचे मन एकरुप झाले आहे. केवळ निळ्या रंगाच्या अनेकविध प्रकारच्या भावछटाच्या आधाराने कवयित्रींने आपल्या मनातील (कृष्णाचे) भक्तीचे स्वरुप व्यक्त केलेले आहे. त्यामुळे कवयित्रीचे धार्मिक भावनेने संपन्न असलेले मन यातून दिसून येते. विशेषत: राधा कृष्णाचे येणारे संग्रहातील उल्लेख त्यादृष्टीने आपण बघण्यासारखे ठरतात. पहा,

रुणझुणली गं कृष्णपैंजणे
हसली राधा श्रावणधारा

किंवा

कान्हाहि गोकुळीचा आज द्वारकेत आहे
दृष्टी सहर्ष फाके नि चक्र व्यग्र आहे
त्याने कधीच त्याजिली वृंदावनात राधा
अन् बहरत्या फुलांच्या ऐशा कित्येक बाधा

कृष्ण भक्तीविषयीचे आपल्या मनातील सर्व भाव प्रकटीकरणासाठी मंदा कदम यांना अशा प्रतीभा वापराव्या वाटल्या असाव्यात. विशेषत: कृष्ण अस्तित्वाच्या दर्शक निळ्या रंगाचे अनेकविध प्रकारांनी उल्लेख करुन या भावनांना मूर्तरुप दिलेले आहे. आणि या निळ्या रंगाच्याच प्रतिमांचे एक अनोखे विश्व ते उभे करताना दिसतात. अशा कितीतरी प्रतिमा उदाहरणादाखल देता येतील. उदाहरणार्थ,

आज निळेपण आभाळाला
तुझी आठवण मनात दाटे........
रानपाखरे भिरभिरताना
झिरमिर श्रावण उन्हात भेटे

आणि

ही सुगंधी ओली वेळ अन् दिशा फुलांच्या झाल्या
भरभरुन वाहे ऊर आभाळसरी या आल्या
रण्यातुन हुंदडतो हा निळा सावळा कान्हा
कौलावर गिरक्या घेती मनचिंब राधिका ओल्या

राधा, कृष्ण, गोकुळ, द्वारका परिसर इत्यादींच्या उल्लेखाने मंदा कदम नवनव्या प्रतिमांची एक आल्हाददायक आरासच रचताना दिसतात. आणि त्या आराशीत निळ्या रंगाच्या निरनिराळ्या फिकट गडद छटांचा मनोरम विलास दृष्टीस पडताना दिसतो. यातून त्यांच्या मनातील भक्ती प्रेमाला पौराणिक प्रमिमांच्या आधाराने एक निराळीच झळाळी आलेली दिसते.

सांजणवेळ्या काव्यसंग्रहातील उत्कट, तरल अनुभूतींच्या अविष्कारासाठी तितक्याच तरल प्रतिमा कवयित्री वापरते. हुरहुरत्या पाऊलवाटा, आषाढचिंब वसने, स्वरांचा हिंदोळा, यातनांच्या चुली, हिरवी नाती, स्पटिकशुभ्र आसवे, चांदणवेडे आभाळ, रंगभरली मेंदी, जीवाचे फुलपाखरु, रंग भरले मेघ, दवबिंदूंची आर्तविराणी, सांजनुपूर अशा कितीतरी निसर्ग प्रतिमांतून 'साजणवेळा' भरुन राहिला आहे.

ऋतुनादमध्ये पाऊस या प्रतिमेतून येणारी साजणाची विविधरुपे अनुभवायास मिळतात. फार दिसांनी जसा प्रियकर आपल्या सखीला भेटावयास यावा आणि त्या प्रेयसीचे तत्काळ नेत्र भरुन यावेत तसा हा पाऊस आतुर झालेल्या नायिकेच्या भेटीसाठी येतो. इथे तिला येणारी अनुभूती अवर्णनीय अशी आहे.

ऋतुनादमध्ये येणाऱ्या प्रतिमांनी भावगर्भ असा सौंदर्याविष्कार साकार केला आहे. सावळा तरुण मेघ, आभाळातील रापे, सांजफुलांची नाती, स्वप्नांच्या पाऊलवाटा, घडीची पैठणी, धुंद वृक्षवेली पर्णे, हिरवळती पाऊलवाट, बहुरुपी सोंग घेणारा खट्याळ पाऊस, खिन्न उजाड आभाळ, घननीळ सावल्या, पिवळीशी उन्हे, ओले ती पहाट, सोनपिवळी पाने, लाल वळणाची वाट, बांधावरची हळदी केतक अशा कितीतरी प्रतिमांची रेलचेल आहे.

## निसर्गप्रतिमा :

कवयित्रीला निसर्गप्रतिमासृष्टीचा खुप ध्यास असल्याचे जाणवते. या प्रतिमांद्वारे आपली निसर्गजाणीव त्या सजविताना दिसतात. निसर्गातील भव्य पर्वत, भीषण कडे, फेसाळणाऱ्या लाटा,

प्रचंड धबधबे, गर्दराने त्यांच्या मनाल ओढ लावीत नाहीत तर आसपासचा हळवा, नाजुक निसर्गच त्यांना भावव्याकुळ करतो. बांधावरची हळदी केतक, खट्याळ पाऊस, धुंद पाने, घननीळ सावल्या, पिवळीशी उन्हे, थंडगार वारा, असा निसर्ग त्यांचे मन वेधून घेतो. तो अधिक वेचक करुन प्रगट करण्याच्या त्यांच्या शैलीतून त्यांची प्रतिमादृष्टी आकारास आली आहे. खुरटलेली झाडे, शिणून गेलेला उंच माड, लाल वळणाच्या वाटा, आषाढचिंब वसने, हिरवी नाती, रंगभरले मेघ, वठलेले झाड अशा अक्षरश: अगणित प्रतिमांचा खच मंदा कदम यांच्या कवितेत पडला आहे.

निसर्ग आणि मानव यांच्यातील भावनिष्ठ अतूट संबंधाची जाणीव प्रत्येक कवीच्या मनात असल्याने आपले मनोभाव प्रकट करताना त्यांना सतत निसर्गाचा आधार घ्यावा लागला आहे. ना. घ. देशपांडे, वसंत बापट, बा. भ. बोरकर, मंगेश पाडगांवकर, इंदिरा संत आणि ना. धो. महानोर इत्यादी निसर्गवेड्या कवींनी आपल्या प्रेमव्याकूळ कातर मनोवस्थेला आकार देताना निसर्गाचा माध्यम म्हणून स्वीकार केला आहे. निसर्गाच्या सूक्ष्म हालचालींचा वेध घेण्यात ही कविता अतिशय रमताना दिसते. आकर्षक शब्दचित्रे रंगविण्यात हे कवी सिध्दहस्त आहेत. सर्वच कवींना रंगांची अनिवार आसक्ती आहे. त्यामुळे बहुतांशी निसर्ग कविता प्रतिमांच्या भाषेतून बोलते. प्रतिमा व प्रतिमासंकराचा हव्यास हे या कवींच्या कवितांचे महत्वाचे वैशिष्ट्य आहे.

मंदा कदम यांच्या कातरवेळ, साजणवेळा, ऋतुनादमधील प्रमितासृष्टीचे मंगेश पाडगांवकर आणि इंदिरा संत यांच्या निसर्ग प्रतिमा सुष्टीशी साम्य आहे. एकंदर मराठी काव्य सृष्टीत निसर्गकाव्य मोठ्या प्रमाणात असल्यामुळे तितक्याच प्रमाणात निसर्गप्रतिमांची रेलचेल आहे. उदा. इंदिरा संत यांच्या काव्यात रंगासक्त, निसर्गप्रतिमांचा वापर झाला आहे. त्यांची प्रतिमा निर्मिती ही अत्यंत चित्रमयी आहे. अमुर्त भावनुभूतीच्या अभिव्यक्तीसाठी कलहीन अलंकाराचे रुपडे आपल्या प्रतिमा सृष्टीद्वारा उभे करण्याची आवश्यकता त्यांना भासत नाही. त्यांची प्रतिमा त्यांच्या भावजीवनाशी संपूर्णपणे संलग्न झालेल्या असतात. गं. ब. ग्रामोपाध्ये म्हणतात ''त्यांच्या प्रतिमांचा जन्म कवितांच्या प्रतिमाबरोबर होतो. नव्हे स्वतंत्र कविताच जणू त्यांच्या रुपाने अवतरतात. शिवाय त्या प्रतिमा जेंव्हा अवतरतात तेंव्हा त्या मुख्या आणि एकएकट्या अवतरण्याऐवजी विशिष्ट संदर्भात आपला असा एक स्वतंत्र आकृतीबंध घेऊन अवतरतात हा आकृतीबंध जसा संपूर्ण असतो. स्वयंपूर्ण असतो तसाचा तो कलात्म असतो, सुंदर असतो. तर आपल्या प्रतिमानिर्मितीच्या संदर्भात मंगेश पाडगांवकर म्हणतात. 'निसर्गातल्या प्रतिमा अभावितपणे आणि अपरिहार्यपणे माझ्या अनुभूतीचे माध्यम बनतात. माझ्या अनुभवाच्या स्पंदनाच्या अगदी सहज असा सुसंवाद निसर्गाशी साधला जातो

आणि म्हणूनच केवळ एखादे फोटोसारखे चित्र रेखाटावे या हेतूने मी माझ्या कवितेतून सहसा निसर्ग चितारीत नाही. व्यक्त होऊ पाहणारा माझा अनुभव निसर्गप्रतिमांशी एकवर झालेला असतो.

कवयित्रीला निसर्गप्रतिमांचा खूप ध्यास असला तरी कवयित्रीच्या अनुभव पध्दतीत एकसुरीपणा निर्माण झाल्याचे जाणवते. आपल्या अनुभूतीचे अपरिहार्य माध्यम म्हणून अगदी सहजपणे ह्या प्रतिमांचा वापर त्यांनी केला त्यामुळे बदलत्या कालप्रवाहात त्या बेगडी ठरल्याप्रमाणे वाटते. प्रतिमा केवळ सजावटीसाठी वापरले जाणारे साधन नाही हे लक्षात न आल्याने स्वाभाविक भाषेचा प्राण असणारी विविधांगी प्रतिमा मंदा कदम यांच्या काव्यात नाही. वाचकांच्या भावना आणि संवेदना जागृत करण्याची ताकद त्यामुळे त्या प्रतिमांमध्ये नाही. मुलत: चांगले आणि वाईट असे प्रतिमांचे विभाजन कवयित्रीने न करता सर्वत्र प्रतिमांतून अखेरत: सौंदर्याचीच निर्मीती होते या जाणिवेने त्यांनी प्रतिमा योजल्या आहेत.

## शब्दकळा :

मंदा कदम यांच्या काव्यसंग्रहाचे विशेष म्हणजे कवयित्रीने काव्यरचना करताना जाणीवपूर्वक केल्यासारखे वाटते. त्यामुळे काव्याला एकसारखेपणा येतो. तरीही कवितालेखनाच्या वेळेचा कवयित्रीचा मूड तिचे चिंतन यामुळे कवितांची रचना समान झाली आहे. अपवाद फक्त 'चंदनाचे देणे' ह्या दीर्घ काव्यसंग्रहाचा आहे.

कवयित्रीने बहुतांशी कविता तीन व चार कडव्यात लिहिलेली आहे. त्यांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करता येईल.

## तीन कडवी असणारी कविता :

**कातरवेळ :**

रेशीम नातं, मेघदूत, प्रतिमा, जयजयवंती, निदान, कार, पोकळी, पाऊलखुणा, कैद, बुध्दिबळ.

**साजणवेळा :**

दूरात दिवे झुरताना, केशरभेट, लक्ष -लक्ष, निरोपाचेक्षण, कुणास ठाऊक

**ऋतुनाद :**

आला थंडगार वारा, मेघ सावळा तरुण, अरे उनाड पावसा, पाऊस असा दाराशी, तुझ्या झिम्माड मिठीत, सुंदर सावळे, भुरभुरती पाऊस जेंव्हा, पहाटेच्या शांतवेळी, किती कोवळा पाऊस पिवळ्याशा उन्हामध्ये, हिव भरले वाऱ्यात, झाडापेडावर आता रात थंडगार ओली.

## चार कडवी असणाऱ्या कविता :

**कातरवेळ :**

मी अशी बहरले होते, सजणी, आरास, चंद्रगौर, तेंव्हा मात्र पल्याड शब्दांच्याही, कधी कधी, सीमोलंघन, हे ज्ञानदेवी.

**साजणवेळा :**

कधी सांजवेळी, स्वप्नसर, हे शाल्मली, शिशिरातील संध्याकाळ, तेंव्हा आता, आज, साखळी, रात्र उतरणीवर, आज सखे गं. पुन्हा पुन्हा का? सांजनुपुर वस्त्रे.

**ऋतुनाद :**

आभाळ उभे डोळयात, जुन्या वाऱ्याने आणला, किती युगांनी पावसा, आला पहिला पाऊस, किती जाहलास वेडा, आला शहारला वारा, भुरभुर पावसा रे, दडी मारुनीया बसे, काणते रे तुझे रुप, आला आला हा पाऊस, आले पसरुन पाहू, दिस उजाडला तरी, दिवे फेकतात झोत, कोणासाठी उतरती, नागमोडी पायवाटा, झाडाझाडावर आता, ओला उखाणा, प्रश्न, पंखनक्षी

वरील कातरवेळ, साजणवेळा आणि ऋतुनादमधील बहुतांशी कविता सलग आहेत. 'चंदनाचे देणे' हा तर दीर्घ कवितांचा संग्रह आहे. पुष्कळ कविता आकाराने लहान असल्यातरी गुणाने समृध्द आहेत. बालकवींच्या काव्यात दिसणारे अल्पाक्षरत्व व चित्रमय हे काव्यगुण मंदा कदम यांच्या काव्यात प्रकर्षाने जाणवतात.

**शब्दांची पुररुक्ती :**

पुनरुक्तीचा कलात्मक उपयोग वर्णने ठाशीव करण्यास व योग्य वातावरण निर्माण करण्यास काही वेळा केला जातो. सामान्यत: पुनरुक्ती ही दोषरुप असली तरी एखादी कल्पना, भावना वा विचार मनावर ठसविण्यासाठी पुनरुक्तीचा चांगला उपयोग होतो. बालकवींना अशा पुनरुक्तीची बरीच हौस होती. उदाहरणार्थ पहा,

'हिरवे हिरवे गार गालिचे'
'झुलवित अपुले तुरे तुरे'
'दरी दरी घुमवित येई
वरखाली गाणे गाणे

कवयित्री मंदा कदम यांनाही अशा पुनरुक्तीची हौस आहे. त्यांच्या कातरवेळ, साजणवेळा, आणि ऋतुनाद या संग्रहातली अशी शब्दांची पुनरुक्ती मोठ्या प्रमाणात झाली आहे. कवयित्रीने आपल्या भावनांच्या अभिव्यक्तीसाठी अशा शब्दांचा वापर केल्याचे स्पष्टपणे दिसते. पहा,

किती युगांची प्रतिक्षा
किती युगांची असोशी

वरील किती युगांची, किती युगांची या पूनरावर्तीत झालेल्या शब्दातून विरही मनाचे दर्शन होते. किती युगांची, किती युगांची या शब्दांनी रसिकांच्या मनात निर्माण होणाऱ्या कल्पनेला ताणून धरले आहे. त्यामुळे तत्काळ विरहाची दाट छाया दिसून येते, व्याकुळता जाणवते. त्याचप्रमाणे

कधी भरेल आभाळ
कधी कोसळेल खाली
कधी मिटेल दुरावा
कधी मिटेल काहिली

वादळवारा जेंव्हा सर्वत्र थैमान घालू लागतो, थंडगार वाऱ्याची लहर शरीरांगाला भिडते तेंव्हा पावसाच्या आगमनाची सूचना मिळते. पावसाच्या येण्याची वार्ता जेंव्हा वारा घवून येतो त्यावेळी तप्तधरणी त्याच्या भेटीस उत्सुक बनते. ह्या उत्सुकतेचे दर्शन आपल्याला इथे प्रतीक्षा (साजणवेळा

क. क्र. १२) या कवितेत घडते. कधी कधी या पुनरावर्तीत झालेल्या शब्दांनी काव्याला एक वेगळा रंग प्राप्त होतो आहे. बहर येतो आहे. अशा पुनरुक्तीची काही उदाहरणे-

१) उठसजणी, उठसजणी उचल आता पाऊले
दूर नाही, दूर नाही क्षितीज अपुले राहिले

२) रंध्ररंध्रामध्ये रुखांच्या
कळ्याकळ्यांन येते भरते
फांदी डवरुन येता
गाठ रेशमी उरात सलते

३) तिपीतिपी उन्हामध्ये
लपालपी तान्हुल्यांची
झिमझिमतो पाऊस राणी
कानात जणू गुणगुणतो

अशा पुनरावर्तीत झालेल्या शब्दांनी कातरवेळ, साजणवेळा आणि ऋतुनादामधील कविता लयबध्द झाली आहे. त्यामुंळे नकळतपणे वाचकांचे ओठ त्या ओळी गुणगुणू लागतात. एवढे सामर्थ्य त्यांच्यात भरुन राहिले आहे.

मंदा ऋदम यांच्या कवितेत विशिष्ट शब्दांच्या पुनरावृर्तीत जसे स्थान आहे त्याचप्रमाणे लयबध्दतेलाही सर्वाधिक महत्व दिलेले आहे. त्यामुळे बहुतांश ठिकाण यमक रचना सापडतात. उदा,

हलके हलके मन
सावरीचा कापूस
फुलपाखरी क्षण
हर्षाचा पाऊस

(कातरवेळ पृ. क्र. १०)

किंवा

दूर थांबला साजण
मध्ये अनोळखी पाणी
डोळा तुडुंब वादळ
उरी मौनावली गाणी .

(साजणवेळा पृ. क्र. २७)

किंवा

आला शहारला वारा
आल्या गंधगार धारा
चिंब धरतीची कूस
सवे साजणाचा श्वास

( ऋतुनाद -पृ. क्र. २८)

कवयित्रीने आपल्या काव्यरचनेत विशेषणांचा वापरही केला आहे. उमलणाऱ्या कळ्या कोमल असतात. मुक्या कळ्या, पिसाट वारा, श्यामल सायंकाळ, कृष्णमेघ, हिरवी माती इत्यादींचा वापर केला आहे. त्यामुळे कवितेला अर्थ सौंदर्य प्राप्त झाले आहे. त्याचबरोबर एखाद्या वस्तुचा अथवा व्यक्तिचा (उदा- चंदनाचे देणे - मधील आजी) नेमकेपणा व वैशिष्ट्य अतिशय ठराविकपणे व्यक्त झाले आहे.

कवयित्रीने काव्यात काही संस्कृतप्रचूर शब्दांचाही वापर केला आहे. संस्कृत शब्दांचा कलात्मक वापर हे या संग्रहाचे महत्वाचे वैशिष्ट्य दिसून येते. कवयित्रीने लहानपणी पुराणकथा ऐकल्यामुळे व वाचल्यामुळे त्याचा परिणाम म्हणून संस्कुत शव्द काव्यात आलेले असावेत. उदा- आम्लात, अद्वैत, मृदगंध इ.

## वातावरण :

वातावरणाला काव्यात अधिक महत्व असते. योग्य वातावरण निर्मिती झाली की, रसपरिपोष होतो. कोणतीही पार्श्वभूमी ही काव्यामागे छायेसारखी उभी असते तर वातावरण हे सर्व काव्यांमध्ये स्वैरपणे संचार करीत राहते. अनुकूल मनस्थितीची निर्मीती म्हणजे वातावरण निर्मिती असे सर्व सामान्यपणे म्हणता येईल. काव्याचा योग्य वातावरण निर्मितीस परिणामकारक वर्णनाचे पुष्कळ साहय्य होते. त्यामुळे काव्यातील वर्णनाला महत्वाचे स्थान असते.

उदा- होनाजी बाळानी आपल्या ''घनश्याम सुंदरा, श्रीधरा अरुणोदय झाला । उठी लवकरी वनमाळी । उदयाचळी मित्र आला'' या भूपाळीत सडासमार्जन, घरोघरीचे अखंडदीप, यमुनाजळाकडे गोपींचे होणारे प्रयाण, गायींच्या धारा, दहीमंथन इत्यादींचा उल्लेखाने सकाळचे प्रसन्न वातावरण निर्मिले आहे.

अर्वाचित मराठी काव्यामध्ये पाडगांवकर, अनंत काणेकर, बोरकरांच्या कवितांतून चांदण्यारात्रीचे धुंद वातावरण प्रकट होते. गोविंदाग्रज यांच्या `स्मशानातील गाणे`, `घुबडास` या

कवितातून तर बालकवींच्या 'खेड्यातील एक रात्र' ह्या कवितेतून भयानक वातावरणाची निर्मिती झालेली दिसते.

अलिकडे दलित कवींच्या काव्यातून ग्रामीण वास्तवतेचे दर्शन घडते. त्याचबरोबर केशवसुत, बा. सी. मर्ढेकर, नारायण सुर्वे वैगेर इत्यादींच्या काव्यातून सामाजिक जाणीवा तीव्रपणे प्रकट होते. अरुण कोलटकर, दिलीप चित्रे, वसंत गुर्जर, सतीश काळसेकर, नामदेव ढसाळ यांची कविता महानगरीय संवेदनाचा एक व्यापक सखोल आणि प्रक्षोभक आविष्कार घडविते. महानगरीय जीवनात निर्माण झालेली शुन्यतेची आणि निरर्थकतेची जाणीव, यंत्रांचे खडखडाट, लोकलमधील प्रचंड गर्दी, धावपळ, फुटपाथवर कण्हणाऱ्यांचे आवाज, ताणतणाव, असुरक्षितता अशा शब्दांच्यातून निर्माण होणाऱ्या वातावरणाची जाणीव तीव्रतेने होते.

मंगेश पाडगांवकर, बा. भ. बोरकर, ना. घ. देशपांडे, इंदिरा संत, कृ.ब. निकुम्ब आणि वासंती मुझूमदार यांच्या कवितेतून निसर्गचित्रे येतात. त्याचबरोबर सकाळच्या फुलात न्हालेली पहाट, प्राजक्तांच्या फुलांवरील दवबिंदू, उगवत्या सूर्याचा सोनेरी प्रकाश ह्यातून सकाळच्या मनोहर वातावरणाचे दर्शन घडते. तसेच बेधुद वाहणारा वारा, भरुप आलेले आभाळ, हवेत पसरलेला गारवा ह्यामधुन पावसाच्या आगमनापूर्वीची तर पाऊसाळ्यानंतर सर्वत्र दिसून येणारी हिरवळ, खळखळता निर्झर, गवतावरचे शुभ्र दवबिंदू, इंद्रधनुष्य अशा वातावरणाची निर्मिती दिसून येते. निसर्गातील अशा बेहोशी वातावरणाचे आकर्षण प्राय: सर्वांनाच असते.

पावसाळ्याचे बेभान, धुंद, करणारे आकर्षण, आषाढ श्रावण, शिशिरातील खिन्नता, वसंतातील स्वप्नवेड, ग्रिष्मातील स्वप्नांचे करपणे, हेमंतातील उनसावल्यांचा खेळ ह्या सर्व निसर्गातील ऋतुचक्रांचे प्रतिबिंब काव्यात मोठ्याप्रमाणात पडलेले दिसून येते. ह्यामधून होणारी निसर्ग निर्मिती, वातावरणनिर्मिती ही त्या काव्याला वेगळा नाद प्राप्त करुन देते. आशयाची अनुभूती वाचकांना तात्काळ येते.

कवयित्री मंदा कदम यांच्या कातरवेळ, साजणवेळा आणि ऋतुनाद ह्या काव्यसंग्रहाचे वातावरण हेच प्रधान वैशिष्ट्य आहे. कवयित्रीने आपल्या भावानुभवांना व्यक्त करण्यासाठी योग्य असे वातावरण निर्माण केले आहे. सुर्य अस्ताला चाललेला असतो, पाखरे घरट्याकडे परतू लागलेली असतात, चरावयास गेलेली गुरे घरच्या ओढीने परतत असतात त्यांची पायधूळ सरत्या सांजेच्या पंखाला बिलगलेली असते. आभाळात उधळलेले रंगही फिक फिके होऊ लागतात. मधूनच एखादा चूकार पक्षी जीवाचा आकांत करीत आभाळाच्या घुमटाखाली उगाचच हिंदोळत राहतो. अशा

प्रकारची वातावरण निर्मिती कातरवेळच्या प्रस्तावनेत कवयित्री करताना दिसते. यावरुन आपणाला स्पष्टपणे कातरवेळेची जाणीव होते. कल्पना येते. कातरवेळ ही वेळच अशी असते की, त्यावेळी एकप्रकारची अंतर्मुखता येते. अशा अवस्थेत माझ्या कवितांचा जन्म झाला असल्याचे कवयित्रीने मनोगतात सांगितले आहे. एकंदर वातावरण हे काव्याचा आशय, विविधांगी विषयाची झालेली अभिव्यक्ती अधिक सोयीस्करपणे समजण्यास साहय्यभूत ठरते.

'कातरवेळ' काव्यसंग्रहातील काही काव्यातून तर कवयित्रीची कातरवेळ बद्दलच्या विचारांची कल्पना येते. या संग्रहात अनेक कविता अशा आहेत की ज्या कविता 'कातरवेळी' दुरावलेल्या प्रियकराची लय नायिकेला प्रकर्षाने येते. आकाशात एक चांदणी उमलते, हळूहळू चंद्राकडे सरकते तेंव्हा तिच्या अंतकरणात वणवा पेटतो, चहूकडे अंधार दाटतो तेंव्हा तिच्याही हृदयात निराशेचा काळोख दाटतो. सफल आणि विफल दोन्ही कवितात 'कातरवेळी' ला महत्वाचे स्थान आहे.

सांजवताना जसे साध्यरंग आकाशात सहजतेने उधळले जातात तसेच जीवभाव या कातरवेळी जड होवून उधळतात. हिरव्या चुड्यांचे लावण्य होवून एखादे चुकार आवर्त मनाचा रांजण ढवळून काढते पण तरीही तिचे जीवभाव हाती वरमाला घेतलेल्या कन्याकुमारीसारखे अचल असतात. अशाच एका श्यामल सायंकाळी 'स्वप्नपारवा' अवचित घुमतो. उठ सजणी (क.क्र.६) मधील संयमी प्रियकर दिपलागण झांझवताना आपल्या प्रेमिकेला दूर होण्याची सूचना करतो. सांजवताना त्याचा सहवास संपतो तेंव्हा भरलेल्या नयनांनी त्याचबरोबर घालविलेल्या सुखद क्षणांची आरास उतरविली जाते. जयजयवंती (क्र.११) कवितेत ती म्हणते ,

कातरवेळ
सावली चाहूल
सुगंधी विळखा
पंचमसूर !

आठवण (क्र. १८) कवितेतही 'कातरवेळी' त्याची तिला आठवण प्रकर्षाने येते. हुरहुरणारी भरली सांज, पश्चिमवाऱ्याचा भरणारा पखवाज, आभाळरंगात न्हालेले मन आणि गवती स्पर्शाने थरारलेले तन अशा वातावरणात अंतरंगात भिरभिरणारे चिमुकले पक्षी भावकत्तोकांची नक्षी उजळतात.

जेंव्हा आभाळात उन्हं उतरणीच्या वाटेवर सोनरंग उधळीत परतू लागतात, पिंपळाच्या सावल्या सायंकाळच्या दिशेने लांबू लागतात, घरावर घर चढू लागते, तुळशीचा दिवा वाऱ्यावर झुलू लागतो अशा कातरवेळी त्याच्या आठवणीने तिला गहिवरुन येते.

डोळ्याकाठी तेंव्हा
थबकते पाणी
उरामध्ये तेंव्हा
कोलाहल

'पाऊलखुणा' (क्र. ४६) कवितेत कवयित्री म्हणते झाकोळलेल्या उभ्या सांजेला वारा निवांत असतो तेंव्हा उरातला मोगरा हा का फुलेना ही भ्रांत मनाला उगीचच वाटते.

सांजणवेळेचे मुखपृष्ठ पहाताक्षणी आपल्या आठवणीत रमलेला एक सारंगीवादक ढळत्या सायंकाळी सुरात दुरावलेला आहे. दूरवर प्रियेची समाधी, आभाळातील एक-दोन चुकार पक्षी, जलाशयावरील सायंकालीन किरणपिसारा हे सगळे साजणवेळेचे विशेष दिसून येतात. 'निमित्त साजणवेळा' या आत्मनिवेदनात कवयित्री सांगते की 'साजण' या शब्दाने अनेक काव्यात्मक सौंदर्य दिलेली आहेत. 'तो' व्यावहारिक नात्याच्या शिक्क्याने कैदी झालेला नाही. आकाराकडून निराकाराकडे जाणाऱ्या ईश्वरासारखीच त्याची व्याप्ती आहे. त्याच्यात कोणताच आकाराचा, नात्याचा बंदिस्तपणा नाही. आयुष्याच्या चढणीवर त्याचा आश्वासक हात अत्यत निस्वार्थीपणे पुढे येतो. मानवी नाते संबंधात अलिखित असे देणे घेणे, देव घेव, अपेक्षा यासारख्या गोष्टी गृहीत धरलेल्या असतात. 'साजण' या नात्यात तसे नसते. तो सखा असतो, सांगती असतो. त्यातील अर्मुत भावबंध सुखावणारा असतो. अबाधित सोलिव सुखाच्या शोधात असताना जी हुरहुर लागते त्यासाठी जी ओढ जाणवते त्यावेळी आशा निराशा, आनंद -वैफल्य, तृप्ती-तृष्णा हाती आले आहे असे वाटत असतानाच काही निसटले आहे असे वाटणे यासारख्या जीवघेण्या घालमेलीतूनच भावलोक निर्माण होतात. अशावेळी ज्यावेळा हाती आल्या त्या साजणवेळा. (प्रस्तावना- साजणवेळा)

वेळ कातर असो किंवा 'वेळा' साजणाच्या असोत दोन्हीकडे समय: समानच ! हे दोन्ही संग्रह सौंदर्यवादी कवितेच्या वळणाने जाणरेच. प्रेम हाच विषय काव्यामधून प्राधान्याने आलेला

दिसतो. विशुध्द प्रेमाला काव्यात त्यांनी स्थान दिले आहे. प्रेमभावनेच्या विविध छटांचे, वृत्तींचे दर्शन आपणास कवितांमधून येते. मराठी काव्य प्रांतात गोविंदाग्रज, भा.रा.तांबे, कवी अनिल, बा. भ. बोरकर, माधव ज्युलीयन, बालकवी, ना.घ.देशपांडे, इंदिरासंत आणि अशा कितीतरी कवींनी सौंदर्यवादी कविता समृद्ध केली आहे. त्याच वाटेवर पावले टाकणाऱ्या मंदा कदम ह्या एक कवयित्री आहेत. त्या वाटेवरच त्यांनी आपली म्हणून एक पाऊलवाट तयार केली आहे.

साजणवेळामधी कवितांचा आशय पहाता कवयित्रीच्या आत्मप्रकटीकरणाची स्पष्टता येते. साजणवेळातील साजण हा मानवी जीवनावर प्रमाचे चांदणे पसरणारा उदात्त व्यक्तिमत्वाचा आहे. कवयित्रीच्या भावजीवनाचा तो एक अविभाज्य भागच आहे. अशा साजणाची आठवण तील नेहमीच दाटून राहते. विशेषत: निसर्ग जेंव्हा हसरा आणि आनंदी असतो तेंव्हा हा साजण नायिकेच्या मनात साकार होतो. 'आज' ह्या क्रमांक पंधराच्या कवितेते आज निळेपण आभाळाला । तुझी आठवण मनात दाटे असे सांगणारी नायिका सहज उघडिता जुनीच कविता जुनी रेखिते नवीन झाली असा मजेशीर अनुभव व्यक्त करते. सहाव्या 'नकोस गाऊ' कवितेत कातरवेळी मनात हुरहुर दाटलेली असताना नायिका म्हणजे 'नकोस गाऊ प्रीत पाखरा । गीत साजणा अशा अवेळी आणि नंतर मी वठलेले झाड पाखरा । कशास करिसी गळा मोकळा असा तिचा व्याकुळलेला प्रश्न आहे.

साजणवेळामधील बऱ्याचशा कवितांतून प्रीतीचा अविष्कार घडविला आहे. गाणे तुझेच, नकोस गाऊ, प्रतिक्षा, चकवा, एक पौर्णिमा, सल, आज सखे गं, केशरभेट इत्यादी कवितांमधून घडतो. एकंदर या कवितांच्या आशयाचा अभिव्यक्तीसाठी येणारे वातावरण वाचकांना अंतर्मुख करते.

ऋतुनादमध्ये 'पाऊसधारा' ह्या पहिल्या विभागातील दुसऱ्या कवितेत, आला थंडगार वारा । आला तुझा रे सांगावा । किती दुरुन साजणा तुझ्या स्पर्शाचा ओलावा असे प्रारंभीच म्हटल्याने आपणाला पावसाच्या आगमणाची जाणीव होते, चाहुल लागते. अशा प्रकारे वातावरण निर्मिण केल्याने रसिकांना काव्याच्या संपुर्ण आशयाची कल्पना येते. रमलास कुठे तू राजा ये उधळित वादळवारा, घनदंग होऊनी ये रे, तू ये ना गर्जत थोडा अशा परिणामकारक वातावरणामुळे पावसाचे बेधुंद आकर्षण वाचकांच्या डोळ्यात साठून वाहते.

## भाषा शैली :

मंदा कदम यांची भाषा शैली अतिशय समृध्द आणि देखणी आहे. मोजक्याच शब्दात त्या परिपूर्ण निसर्गचित्र, भावानूभव अर्थपूर्ण रितीने उभे करतात. हळूवार, संवेदनक्षम मन त्यांच्यापाशी असल्यामुळे ज्या भावनांनी मानवी जीवन सुंदर होते त्या भावना त्यांच्या कवितेतून नाजूकपणे पाझरतात. त्यासाठी त्यांनी शब्दांचा वापर चातुर्याने केलेला आहे. नेमके पैलूदार शब्द आपल्या भावशयाच्या अभिव्यक्तीसाठी आकर्षपणे मांडण्याचे कौशल्य त्यांच्या भाषाशैलीत आहे. विशेषण-विशेषांचा वापर, नव्या जाणीवा, नवे शब्दप्रयोग कवयित्रीने आपल्या भाषेत केलेले आहेत. लयबध्दता आणि आशयघनता या कौशल्यामुळे मंदा कदम यांच्या शब्दकलेवर वाचक मोहित होतो. त्यांच्या सुंदरतमं, मोहमयी भाषेमुळे त्यांच्या कवितेत काही दोष राहतात. काव्य निर्मिती करताना कवयित्रीला संस्कृतप्रचूर शब्दांचा जबरदस्त मोह असल्याचे दिसते आणि हा मोहच त्यांच्या कवितेचा दुर्गुण होऊन बसल्यामुळे समीक्षकांचे त्यांच्या काव्याकडे म्हणावे तसे लक्ष गेले नाही.

मंदा कदम यांच्या कातरवेळ, साजणवेळा यासंग्रहातील कवितांचे महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील बहुतांशी कविता आत्मविष्कारी स्वांतसुखाय आहेत. स्वभावना या संग्रहात महत्वाचे स्थान आहे. नायिकेच्या आयुष्यात प्रेमाची पालवी फुटणे, तिचे बहरणे आणि त्यानंतरच तिच्या वाट्याला आलेली एकाकी अवस्था वंचना यांचे चित्रण प्रामुख्याने येते. प्रीतीच्या नशिबी मुहुर्त नसल्याचे विरहाचे दु:ख पुन:पुन्हा आल्याने कविता एकसुरीपणा आलेला जाणवतो.

'कातरवेळ' ह्या पहिल्या संग्रहात कवयित्रीने अनेक नवेशब्दप्रयोग निर्माण केल्याचे जाणवते. भावनाभिव्यक्तीसाठी या नव्या सामाजिक शब्दांची निर्मिती झाली असावी असे वाटते. उद- निमिनपंखी मोर, स्नेहसरता दिवा, काजळकाळी शल्ये, गंध कोवळे शेपटे, लावण्यखणी गझल, स्वप्नताटवे, अदमुरा प्रकाश, युगमौन, गंधहूल, गर्भदेठ वगैरे या नवनिर्मितीने कवितेला सौंदर्य प्राप्त होऊन तरलतेने, संवेदनशीलमनाने, आत्मानुभव व्यक्त झाले आहेत.

कातरवेळमधील बहुसंख्य कविता स्वात्मसुखाय असल्याने त्या अनेकदा गुढ वाटतात. या गुढगुंजनपर कवितातून अनेक अर्थाच्या अनेक छटा निर्माण होतात. स्वांतसुखाय कविता पाच काव्यांच्या दृष्टीकोनातून लिहलेल्या नसतात. तिथे फक्त स्वानुभवाचे स्व-भावनांचे चित्रण केलेले आढळते त्यामुळे काही वेळा या कविता अनाकलनीय क्लिष्ट बनतात. उदा - गहिवर (कातरवेळ क्र.२६) तरीही कातरवेळमधील कवितांना लय आहे. सौंदर्य आहे..नाद आहे. संवेदनशीलमनाने,

रसिकवृत्तीने इथे अनुभव टिपलेले आहेत त्यामुळे येथे नवकवीप्रमाणे बंडखोरीपेक्षा सौंदर्यच प्रकर्षाने आढळते.

कातरवेळ, साजणवेळा आणि ऋतुनादमधील निसर्गाचा अत्यंत समर्पक असा वापर कवयित्रीने कवितेत केलेला आहे. इथे निसर्ग आणि मानवी भावना ह्या इतक्या एकत्र आल्या आहेत की, त्यांना वेगळे काढणे कठिण. बहुतेक कविता निसर्गातच उमलत जाताना दिसतात.

## सारांश :

प्रबंधिकेच्या या प्रकरणात आपण कवयित्री मंदा कदम यांची शब्दकला कशी आहे याचा थोडक्यात विचार केला आहे. कदम यांची भावशैली आपण पाहिली, नव्या जाणीवा, नव्या प्रतिमा आणि शब्दयोजना या वैशिष्ट्याबरोबरच नवीन विशेषणे संस्कृत शब्दांचा वापर आपणास कदम यांच्या भाषाशैलीतून पाहाण्यास मिळतात. त्यांची शब्द जाणीव विलक्षण आहे. बालकवी सारखी चित्रमयता आणि लयबध्दता असल्यामुळे वाचक कविता वाचताना गुणगुणू लागतात. त्यांच्या काव्यभाषेवर मोहित होतात. परंतु काही दुर्बोध शब्दरचनेमळे कविता अभ्यासकांच्या लक्षात येत नाहीत.

तसेच या प्रकरणात आपण कातरवेळ, साजणवेळा आणि ऋतुनाद तसेच चंदनाचे देणे या संग्रहातील काव्यप्रतिमांचे स्वरुप पाहिले आहे. काव्यनिर्मितीसाठी सुयोग्य असल्यामुळे वातावरणाचा निर्देश आपण केलेला आहे. मंदा कदम यांच्या वरील काव्य संग्रहातील बहुतांशी कविता नायिकाप्रधान असल्याने स्त्रीमनाचे विविध भाव आपणाला पहाणे अत्यावश्यक आहे त्यादृष्टीने याचा विचार पाचव्या प्रकरणात करावयाचा आहे.

## संदर्भ :


१) कातरवेळ : हिरण्यकेशी प्रकाशन, कोल्हापूर : प्रथमावृत्ती १९९१ : पृ. ७

२) तत्रैव : पृ. १२

३) तत्रैव : पृ. ३५

४) साजणवेळा : हिरण्यकेशी प्रकाशन, कोल्हापूर : प्रथमावृत्ती २००१ : पृ. १२

५) अर्वाचीन मराठी काव्यदर्शन : डॉ. अक्षयकुमार काळे : पा. ना. बनहट्टी प्रकाशन नागपूर - १९९९ - पृ. ३७०-७१

६) गं. ब. ग्रामोपाध्ये : महाराष्ट्र साहित्य पत्रिका पुणे ऑक्टो- डिसें १९५५-पृ. ४८

७) छोरी : मंगेश पाडगांवकर : मौजे प्रकाशन गिरगांव मुंबई प्रस्तावना १९८८.

८) रसग्रहण कला आणि स्वरुप : गो. म. कुलकर्णी : कॉन्टेनेटल प्रकाशन पुणे -३० पृ.७

९) ऋतुनाद : हिरण्यकेशी प्रकाशन, कोल्हापूर : प्रथमावृत्ती २००४ : पृ. १

१०) कातरवेळ : हिरण्यकेशी प्रकाशन कोल्हापूर : पृष्ठ -६

११) साजनवेळा : हिरण्यकेशी प्रकाशन कोल्हापूर : पृष्ठ -३३

१२) कातरवेळ : हिरण्यकेशी प्रकाशन कोल्हापूर : पृष्ठ -९०

१३) साजनवेळा : हिरण्यकेशी प्रकाशन कोल्हापूर : पृष्ठ -२७

१४) ऋतुनाद : हिरण्यकेशी प्रकाशन कोल्हापूर : पृष्ठ -२८

१५) रसग्रहण : कला आणि स्वरुप : गो. म. कुलकर्णी : कॉन्टेनेटल प्रकाशन पुणे - ३० पृ.७,८

१६) कातरवेळ : हिरण्यकेशी प्रकाशन कोल्हापूर : पृष्ठ -६,१८,४६

१७) साजनवेळा : हिरण्यकेशी प्रकाशन कोल्हापूर : प्रस्तावना